लोकमत



प्रज्ज्वला योजनेंतर्गत बचतगटांच्या प्रशिक्षणाचे दीपप्रज्वलन करताना विजया रहाटकर. समवेत महापौर रंजना भानसी, लक्ष्मण सावजी, भारती बागुल, रोहिणी नायडू, संध्या कुलकर्णी, कावेरी घुगे, दीपाली मोकाशी, सरिता सोनवणे आदी.

Nashik Main
Page No. 2 Jun 18, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

# महिलांच्या विकासासाठी सबलीकरण आवश्यक

## रहाटकर : प्रज्ज्वला योजनेच्या निमित्ताने महिला मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक तसेच राजकीय विकासासाठी महिलांचे सबलीकरण आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगातर्फे प्रज्ज्वला योजना कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्व महिला बचतगटांना शासनाच्या शासकीय योजनाविषयक, कायदेविषयक आणि आर्थिक ज्ञानाबाबत महिलांमध्ये जनजागृती करण्याकरिता महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने प्रज्ज्वला योजना आखली असून, त्याअंतर्गत सोमवारी (दि. १७) महिला मेळावा महात्मा फुले कलादालनात पार पडला त्यावेळी रहाटकर बोलत होत्या. यावेळी प्रज्ज्वला योजनेच्या समितीच्या अध्यक्षा श्रीमती दीपाली मोकाशी, आमदार सीमा हिरे, महापौर रंजना भानसी, भाजपाचे प्रदेश सचिव लक्ष्मण सावजी, मनपाच्या महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षा कावेरी घुगे, शिक्षण समिती सभापती सरिता सोनवणे आदी उपस्थित होते.

महिलांना स्वत:च्या पायावर उभे राहायचे असेल तर त्यांनी आर्थिक साक्षर झाले पाहिजे, असे सांगून रहाटकर यांनी राज्य शासनाच्या वतीने महिलांसाठी राबविल्या जात असलेल्या मुद्रा आणि तत्सम योजनांची माहिती आणि त्यातील बारकावे समजावून सांगितले.

यावेळी महानगरपालिकेच्या दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान विभागाच्या शहर प्रकल्प अधिकारी तथा उपआयुक्त श्रीमती जयश्री सोनवणे, व्यवस्थापक व प्रशिक्षण प्रशिक्षक श्रीमती रंजना शिंदे, पल्लवी बवत्ते, संतोष निकम आणि महिला आर्थिक विकास महामंडळाचे सहायक जिल्हा समन्वयक रवींद्र पाटील तसेच रोहिणी नायडू, संध्या कुलकर्णी, भारती बागुल यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

आपलं महानगर

# ‘प्रज्वला’ च्या माध्यमातून महिला सक्षमीकरण

## विजया रहाटकर : गिरणारे येथे महिला आयोगाचा उपक्रम

**नाशिक ▸▸** राज्यातील बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे व महिलांचे सक्षमीकरण करणे महत्वाचे असून त्यादृष्टीने 'प्रज्वला' योजने अतंर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला.

गिरणारे रोड येथील गायत्री लॉन येथे राज्य महिला आयोगातर्फे राबवण्यात येणाऱ्या 'प्रज्वला' उपक्रमाच्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आयोगाच्या प्रज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, आमदार सीमा हिरे, महिला व बालविकास विभागाच्या




उपायुक्त सुरेखा पाटील, पंचायत समिती सभापती रत्नाकर चुंबळे, सरंपच अलका दिवे, पुष्पा जाधव आदी उपस्थित होते. रहाटकर म्हणाल्या, महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग वाढावा यासाठी शासन प्रयत्नशील आहे. यासाठी महिलांचे सबलीकरण महत्वाचे असून प्रज्वला अभियान हे त्या दिशने टाकलेले महत्वाचे पाऊल आहे. या अभियानाच्या माध्यमातून बचत गटांची महिलांना विकासाची संधी देणारी सक्षम व्यवस्था तयार होणार आहे. महिलांचे अनेक कायद्यांच्या माध्यमातून संरक्षण केले जाते व शासनाच्या विविध योजनांद्वारे सक्षमीकरण केले जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या महिला बाल विकास विभागाच्या अनेक योजनांची त्यांनी महिलांना माहिती दिली. तसेच महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य महिला आयोगाचे सर्व सहकार्य राहील, असेही त्यांनी सांगितले. मोकाशी यांनी अभियानाविषयी माहीती दिली. ते म्हणाले, 'प्रज्वला' अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बचत गटाच्या महिलांना प्रशिक्षित करण्यात येणार असून दुसऱ्या टप्प्यात क्लस्टरद्वारे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात आहेत. तसेच तिसऱ्या टप्प्याद्वारे बचतगटांसाठी बाजाराची उभारणी करण्यात येईल.

# महिलांच्या विकासाशिवाय सबलीकरण नाही

## राज्य महिला आयोग अध्यक्षा डॉ. रहाटकर यांचे प्रतिपादन

**म. टा. प्रतिनिधी**, नाशिक

तिचं विश्व

महिलांचा राजकीय, सामाजिक व अर्थिक विकास झाल्याशिवाय सबलीकरण होणार नाही. यासाठी राज्य सरकारने बचतगटाच्या माध्यमातून प्रयत्न केला आहे. महिलांसाठी प्रज्ज्वला योजना आणली आहे. महिला बचतगटांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष डॉ. विजया रहाटकर यांनी केले.

राज्य सरकारतर्फे महिला बचतगटांना प्रज्ज्वला योजनेच्या माहितीसाठी शालिमार येथील महात्मा फुले कलादालनात सोमवारी प्रशिक्षण कार्यशाळा झाली. यावेळी डॉ. रहाटकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास महापौर रंजना भनसी, भाजप प्रदेश चिटणीस लक्ष्मण सावजी, उपायुक्त जयश्री सोनवणे, संध्या कुलकर्णी तसेच नगरसेवकांसह महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

डॉ. रहाटकर म्हणाल्या, की महिला कुठल्याही क्षेत्रात प्रगती करू शकतात. त्या सक्षम आहेत. त्या अबला नव्हे तर सबला आहेत. परिस्थितीला तोंड देण्याची त्यांच्यात ताकद आहे. महिला असलेल्या घरात देवाचे वास्तव्य असते. महिलांची अवहेलना करणाऱ्या घराचा कधीही विकास होत नाही. महिला कमवती असेल तर समाजात तिला सन्मान मिळतो. यासाठी प्रत्येक महिलेने स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. यासाठी राज्य सरकारने विविध योजना आणल्या आहेत. त्याचा लाभ सर्व महिलांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. रहाटकर त्यांनी केले.

महापौर रंजना भानसी म्हणाल्या, की नाशिक महापालिका महिलांच्या सक्षमीकरणासाठी नेहमीच पुढे राहिली आहे. राज्य सरकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. या योजनांना सर्व तऱ्हेचे सहकार्य करण्यास महापालिका सज्ज आहे. राज्य सरकारने दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वेक्षण तातडीने करावे.



पंकज चांडोले



### महिलांसाठी आयोग कटिबद्ध

महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी महिला आयोग कटिबद्ध आहे. राज्य महिला आयोग हे मन जोडायचे काम करते. तसेच ते महिलांसाठी कायद्याने माहेर आहे. अत्याचार होत असतील तर महिलांनी कधीही आयोगाचे दरवाजे ठोठवावेत. त्यांच्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास डॉ. रहाटकर यांनी यावेळी व्यक्त केला.

### ■ प्रज्ज्वला ठरणार उपयुक्त

बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे महत्त्वाचे आहे. त्यादृष्टीने प्रज्ज्वला प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास डॉ. रहाटकर यांनी दुगाव येथे व्यक्त केला. गिरणारे रोडवरील गायत्री लॉन्स येथे प्रज्ज्वला उपक्रमाच्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होते. यावेळी योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, आमदार सीमा हिरे, महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त सुरेखा पाटील, पंचायत समिती सभापती रत्नाकर चुंबळे, सरंपच अलका दिवे, पुष्पा जाधव आदी उपस्थित होते. डॉ. रहाटकर यांचे हस्ते बचतगटाच्या महिलांना प्रातिनिधिक स्वरुपात सहभाग प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

पुढारी

# ‘प्रज्वला’चे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल

## विजया रहाटकर : राज्य महिला आयोगातर्फे कार्यशाळा

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यातील बचतगटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे महत्त्वाचे असून, त्यादृष्टीने प्रज्वला योजनेअंतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल, असा विश्वास महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी व्यक्त केला.

गिरणारे रोडवरील दुगाव येथील गायत्री लॉनमध्ये राज्य महिला आयोगातर्फे सोमवारी (दि. १७) प्रज्वला उपक्रम कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आयोगाच्या प्रज्ज्वला योजनेच्या अध्यक्षा दीपाली मोकाशी, आमदार सीमा हिरे, महिला व बालविकास विभागाच्या उपायुक्त सुरेखा पाटील, पंचायत समिती सभापती रत्नाकर चुंबळे, भाजपाचे प्रदेश चिटणीस लक्ष्मण सावजी, सरपंच अलका दिवे, पुष्पा जाधव आदी उपस्थित होते.



**नाशिक : राज्य महिला आयोगातर्फे आयोजित प्रज्वला कार्यशाळेत महिला बचतगटाच्या सदस्यांना प्रमाणपत्र प्रदान करताना विजया रहाटकर. समवेत दीपाली मोकाशी, सीमा हिरे, सुरेखा पाटील, रत्नाकर चुंबळे, लक्ष्मण सावजी आदी.**

विजया रहाटकर म्हणाल्या, महिलांचा विविध क्षेत्रांतील सहभाग वाढावा, यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी महिलांचे सबलीकरण महत्त्वाचे असून, प्रज्वला अभियान हे त्या दिशने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. या अभियानाच्या माध्यमातून बचतगटांची महिलांना विकासाची संधी देणारी सक्षम व्यवस्था तयार होणार आहे. महिलांचे अनेक कायद्यांच्या माध्यमातून संरक्षण केले जाते. तसेच, शासनाच्या विविध योजनांद्वारे सक्षमीकरण केले जात असल्याचे रहाटकरांनी सांगितले.

महिला उद्योग धोरण तयार करणारे महाराष्ट्र एकमेव राज्य असून, या माध्यमातून महिलांना उद्योगवाढीसाठी सवलती मिळणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी असलेल्या महिला बालविकास विभागाच्या अनेक योजनांची त्यांनी महिलांना माहिती दिली. तसेच, महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य महिला आयोगाचे सर्व सहकार्य राहील, असेही रहाटकर म्हणाल्या. दीपाली मोकाशी यांनी, प्रज्वला अभियानाच्या पहिल्या टप्प्यात बचतगटाच्या महिलांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. दुसऱ्याटप्प्यात क्लस्टरद्वारे उत्पादन करण्याचे प्रयत्न करण्यात आहे. तसेच, तिसऱ्या टप्प्याद्वारे बचतगटांसाठी बाजाराची उभारणी करण्यात येणार असल्याचे सांगितले. कार्यशाळेत सुवर्णा शेफाळ यांनी महिलांविषयक असलेल्या कायद्याची व पीसीपीएनडीटी कायद्याविषयी माहिती सांगितली. तसेच, बँक ऑफ महाराष्ट्राच्या प्रतिनिधी सुनंदा सोनवणे यांनी प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अपघात विमा योजना, अटल पेन्शन व विविध कर्जाच्या योजनांविषयी महिलांना माहिती दिली.

याप्रसंगी प्रातिनिधीक स्वरुपात रहाटकर यांचे हस्ते बचतगटाच्या महिलांना सहभाग प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. कार्यशाळेस बचतगटाच्या एकूण ६०० महिला उपस्थित होत्या.